या जागेसाठी
जाहिरात
घेणे आहे

दैनिक लोकक्रांतीचा आरंभ

# लोकआरंभ

LOK AARAMBH

dainiklokaarambh@gmail.com

संपादकःराहुल मारोतीराव वाईकर

प्रतिनिधी नेमणे आहे.

बीड आंबेजोगाई गेवराई वडवणी केज परळी पाटोदा शिरूर कासार धारूर आष्टी माजलगाव इच्छुकाने संपर्क साधावा

94036 41482

बीड/महाराष्ट्र वर्ष २ रे | शनिवार १८ मे २०२४ | अंक१५९ ● पाने ४ | RNI/MAHMAR/2022/84215 | किंमत २ रु

# मनोज जरांगे यांची प्रकृती अचानक बिघडली

## संभाजीनगरमधील खासगी रुग्णालयात उपचार सुरु; डॉक्टरांचा आराम करण्याचा सल्ला

मराठा समाजाच्या आरक्षणासाठी आंदोलन करणारे मनोज जरांगे पाटील यांची प्रकृती अचानक खराब झाली आहे. त्यामुळे त्यांना छत्रपती संभाजीनगरमधील एका खासगी रुग्णालयात दाखल करण्यात आले आहे. रुग्णालयातील डॉक्टरांनी त्यांना तपासून आराम करण्याचा सल्ला मनोज जरांगे पाटील यांनी चार जून नंतर पुन्हा उपोषण करण्याचा इशारा दिला आहे. मात्र, आठ जून रोजी भगवानगड म्हणजेच बीड जिल्ह्यात होणारी त्यांची सभा रद्द करण्यात आली आहे. या सर्व पार्श्वभूमीवर त्यांची प्रकृती खालावल्याने आता मनोज जरांगे पाटील काय निर्णय घेतात ? या कडे सर्वांचे लक्ष लागले आहे. मराठा समाजाच्या आरक्षणासाठी आंदोलन करणारे मनोज जरांगे पाटील यांनी पुन्हा एकदा ४ जून पासून आंतरवाली सराटी येथे उपोषण सुरू करणार असल्याची घोषणा त्यांनी आहे. तसेच मनोज जरांगे पाटील यांची ८ जून रोजी नारायण गडावर सभा होणार होती. मात्र, बीड जिल्ह्यामध्ये मोठ्या प्रमाणात दुष्काळाचे सावट आहे. त्यामुळे पाणी उपलब्ध नाही. तसेच उन्हाची तीव्रता देखील जास्त आहे. त्यामुळे एकत्र येणाऱ्या मराठा बांधवांची गैरसोय नको, यासाठी नारायण गडावरील सभा रद्द करण्यात आली आहे. आता पुढील सभा कधी होणार? याचा निर्णय अद्याप झालेला नाही. मात्र, तुर्तास आठ जून रोजीची सभा रद्द करण्यात आल्याची माहिती देण्यात आली आहे. मराठा आंदोलनाच्या माध्यमातून मनोज जरांगे पाटील यांनी सगेसोयरेची मागणी पुन्हा एकदा करत असल्याचे सांगितले जात आहे. त्यासाठी त्यांनी चार जून पासून उपोषणाचा इशारा दिला आहे. मात्र, त्या आधीचत्यांची प्रकृती खराब झाल्याने उपोषणाचा निर्णय रद्द होतो की, ते पुन्हा एकदा उपोषणाला सुरूवात करतात, ते पाहावे लागेल. त्यांच्या डॉक्टरांनी मात्र, त्यांना आराम करण्याचा सल्ला दिला आहे. त्यांना



थ्रोट इन्फेक्शन झाले असल्याची माहिती देखील त्यांच्या डॉक्टरांनी दिली आहे. तसेच इतरही काही तपासण्या करण्यात आल्या असून त्यांचा अहवाल अद्याप प्राप्त झालेला नाही.



# पारगाव सिरस येथे बैलगाडी शर्यतीमध्ये आली रंगत ..! शेकडो शेतकऱ्यांनी घेतला स्पर्धेमध्ये सहभाग ..!



**( बीड प्रतिनिधी )**

बीड तालुक्यातील मौजे पारगाव सिरस येथे श्री. भैरवनाथ यात्रेनिमित्त भव्य बैलगाडा शर्यतीचे आयोजन सरपंच दिनकर जमदाडे यांच्या वतीने करण्यात आले होते. या स्पर्धेसाठी जिल्ह्यासह राज्यभरातून शेतकऱ्यांनी आपल्या बैलगाडी सह सहभाग नोंदवला. या स्पर्धेची तयारी करत बीड तालुका व परिसरातील शेतकऱ्यांनी आपल्या बैलाचा सराव करून घेऊन, पश्चिम महाराष्ट्रातील शेतकऱ्यांच्या बैलासोबत सपर्धा केली. पूर्वी बीड जिल्ह्यामध्ये अशा स्पर्धा कमी प्रमाणात होयच्या परंतु पश्चिम महाराष्ट्राला लाजवेल अशा स्पर्धेचे आयोजन बीड जिल्ह्यातील हौशी शेतकरी बांधव आपल्या ग्रामदैवताच्या यात्रेनिमित्त करत आहेत. या स्पर्धेमध्ये शेतकऱ्यांचा सहभाग व उत्साह मोठ्या प्रमाणात होता. बैलगाडी किंवा बैलगाडा हा ग्रामीण भागामध्ये हौशीचा विषय झाला आहे. पूर्वी बैल हा शेतीकामासाठी त्याचा वापर होयचा. परंतु आता बैलगाडी शर्यतीमध्ये आपला बैल स्पर्धेत टिकावा यासाठी पोटच्या मुलाप्रमाणे शेतकरी त्याच्यावर प्रेम दाखवत आहेत. बीड जिल्ह्यामध्ये देखील पश्चिम महाराष्ट्रा सारख्या स्पर्धा होव्यात यासाठी सर्वात अगोदर पुढाकार घेणारे भारतीय जनता पार्टीचे जिल्हाध्यक्ष राजेंद्र मस्के यांनी गेल्या दोन वर्षापासून उत्कृष्ट असे बैलगाडा शर्यतीचे आयोजन करत आहेत. बीड विधानसभा मतदारसंघातील मौजे पारगाव (सि) येथे ग्रामदैवत भैरवनाथ यात्रेनिमित्त भव्य भैरवनाथ केसरी (२०२४) बैलगाडी शर्यत आयोजित केली होती. या शर्यतीचा शुभारंभ भारतीय जनता पार्टीचे बीड जिल्हाध्यक्ष राजेंद्र मस्के यांच्या प्रमुख उपस्थित आज संपन्न झाला. या स्पर्धेमध्ये बीड जिल्ह्यासह तालुक्यातील व परिसरातील शेतकरी बांधव, बैलगाडा प्रेमीची मोठ्या संख्येने उपस्थित होते. शेतकरी राजांचा रांगडा खेळ असलेल्या बैलगाडी शर्यतीने शेतकरी मित्रांचे पशूधनावर असलेले प्रेम अनुभवास मिळाले. स्पर्धा या अतिशय उत्सहात संपन्न झाल्यामुळे परिसरातील शेतकऱ्यांच्या चेहऱ्यावर आनंद दिसून आला.

# लोकनेत्या पंकजाताईना विजयी करण्यासाठी अहोरात्र धडपडणारा युवा चेहरा - संदीप तांदळे

**पाटोदा : नितिन भोंडवे**

नुकतेच 13 तारखेला पार पडलेल्या लोकसभा निवडणुकीच्या अंतिम निर्णयाची सर्वांना चाहूल लागली आहे. विजयाचा गुलाल उधळवण्यासाठी प्रत्येक कार्यकर्ते उत्सुकतेने वाट बघत आहेत. आपला नेता निवडून आणण्यासाठी प्रत्येक कार्यकर्त्यांनी विजयाची धुरा हातात घेऊन काम करून मतदानास भर पाडण्याचे काम केले आहे त्यामध्ये लोकनेत्या पंकजाताई मुंडे यांना विजयी करण्यासाठी ना . धनंजय मुंडे व वाल्मीक अण्णा कराड साहेब यांच्या मार्गदर्शनाखाली अहोरात्र धडपडणारा युवक,ग्राउंड चा युवा चेहरा संदीप भैया तांदळे यांनी मोलाचा वाटा उचलला आहे. निवडणुकीच्या अगोदर गेले अनेक दिवस संदीप भैया तांदळे यांनी पाटोदा तालुक्या सह जिल्हा पिंजून काढत त्यांच्या विजयाची धुरा हातात घेतली होती. खरं पाहिलं तर युवा चेहऱ्यामधून संदीप भैया तांदळे यांनी खूप युवक एकवटून



ही निवडणूक पार पाडली आहे. लोकनेते पंकजाताई मुंडे यांच्यावरच गुलाल पडणार असल्याची चर्चा युवकांमध्ये होत आहे.

एका सामान्य कुटुंबातून संदीप तांदळे यांचा जीवन प्रवास आहे.गावोगावी समाजसेवा करणे, लोकांचे प्रश्न सोडवणे, अडचणीच्या वेळी धावून जाणे ह्याच त्यांच्या स्वभावामुळे त्यांची पाटोदा तालुक्या सह जिल्हा भर युवा क्रेझ असून त्यांच्या नावाची सर्वत्र चर्चा होत आहे.

## पाटोदा नगरंपचायतवर आरोप करणे सोपे मात्र त्यांच्या सारखा शहराचा विकास ही दुसरे कोणीही करू शकत नाही

**पाटोदा प्रतिनिधी**

ग्रामपंचायतचे रूपांतर नगरपंचायत मध्ये झाल्यापासून पाटोदा शहराच्या विकास झपाट्याने होत आहे. गेली पंचवार्षिक मध्ये आमदार सुरेश धस यांच्या मार्गदर्शनाखाली पाटोदा नगरपंचायतने एखाद्या स्टेडियम पेक्षाही सुंदर अशी हिंदू समशानभूमीचे काम केले असून शहरातील काही भागातील रस्ते व नगरपंचायत मध्ये येणाऱ्या वाड्या वस्त्यावरील रस्ते एकदम टकाटक बनवले आहे व जे रस्ते राहिले आहे ते करण्यासाठी आमदार धस यांच्या माध्यमातून नगरपंचायत निधी उपलब्ध करण्यासाठी प्रयत्न करत आहे. नगरपंचायत व तालुक्यात कुठेही दुर्घटना झाली तर अग्निशामक गाडी उपलब्ध केली असून पाटोदा शहरातील भरणारा आठवडी बाजार हागणदारी मुक्त करून एकदम टकाटक केला आहे.विद्यार्थ्यांसाठी सर्व सुविधायुक्त अभ्यासिकेचे इमारतीचे बांधकाम पुर्ण झाले आहे. शहरातील रस्त्यावर विद्युत दिव्याची सोय करून एकदम झगमगाट केला आसुन शहरात भव्य दिव्य असे राम मंदिर उभारले आहे तर शहरातील मंदिर मज्जित परिसर एकदम टकाटक केले आसुन पाण्याचे टाकीचे काम प्रगतीपथावर चालू असून शहराला लवकरच फिल्टरयुक्त पाणी मिळणार आहे तर शेकडो बेघर लोकांना आपल्या हक्काचे घर पाटोदा नगरपंचायतने दिले

# विषबाधा प्रकरणात उपचार व मदत करणाऱ्यांचा लालवंडी ग्रामस्थांच्या वतीने सत्कार

नायगाव/हानुमंत चंदनकर लालवंडी सामूहिक विषबाधा प्रकरणात प्रशासकीय यंत्रनेने व राजकीय पुढारी,सामाजिक कार्यकर्ते ,लोकशाहीचा चौथा आधार स्तंभ पत्रकार बांधव यांनी घटनेचे गांभीर्य लक्षात घेऊन सौदार्य दाखवत केलेल्या मदतीचा उतराई होण्यासाठी लालवंडी ग्रामस्थ च्या वतीने ग्रामीण रुग्णालय नायगाव येथे त्यांचा सत्कार करण्यात आला.

या कार्यक्रमास ग्रामीण रुग्णालय अधीक्षक डॉ.प्रशांत सोनकांबळे, धंनजय शंकर पाटील चव्हाण,पोलीस निरीक्षक मारोती मुंढे,ज्येष्ठ पत्रकार बाळासाहेब पांडे, प्रा .डॉ. जीवन चव्हाण पत्रकार हानुमंत चंदनकर यांची व्यासपीठावर प्रमुख उपस्थिती होती.

बुधवारी सायंकाळी मोजे लालवडी येथे महाप्रसादाचा जेवणातून ग्रामस्थांना विषबाधा झाली होती. सर्व बाधित रुग्णांवर नायगाव येथील ग्रामीण रुग्णालयात क्षमते पेक्षा जास्त व्यवस्था करण्यात आली .येथील वै.अधिकारी डॉ. पी. बी. सोनकांबळे सर यांच्या मार्गदर्शनाखाली रुग्णालयातील सर्वच डॉक्टर, सिस्टर व सर्व कर्मचारी यांनी अतिशय चांगल्या प्रकारे 'आरोग्य येवा देऊन उपचार केल्याबद्दल लालवंडी येथील ग्रामस्थांनी या सर्वांचा सत्कार केला

यावेळी डॉ.श्री.प्रशांत सोनकांबळे सर, डॉ. पी.बी.कोपंलवाड सर, डॉ. अविनाश कोठाळकर, डॉ. चौधरी मॅडम रा. बिराजदार मॅडम, अधिपरिसेवीका श्रीमती शेल सिस्टर, क्षीरसागर सिस्टर सुकवार सिस्टर, सुधा सिस्टर ,माडेवार वर्षा, रेखा राजवेडवार, वर्षा सोडारे, हणमंत पा. उमरेकर आदी कर्मचारी व मान्यवर यांचा शाल पुष्पहार व बुका देऊन सत्कार करण्यात आला.



या वेळी उद्धव संगेपवाड, कांतराव निकलपूरे ,संतोष नीकलपूरे, दत्तात्रय डोपेवाड, सुमित लालवडे, सुनिल लालवंडीकर, विठ्ठल पवार, प्रवीण जोंधळे, मोहन इंद्र, अनिंद इंद्रे, राजेश पिलगुडे, रमेश पा. लालवंडे, अनिल बोकवाड, व्यंकटी निकलपूरे घोडीबा बामणपले सौ. प्रियांका निकलपूरे, सौ. सुचिता निकलपूरे.आदींची उपस्थिती होती.कार्यक्रमाचे प्रास्ताविक कांतराव निकलपुरे,यांनी सूत्रसंचालन-धनंजय बुयरे लालवंडीकर तर आभार-प्राचार्य संदिप केरूरे यांनी मानले.

संपादकीय

## क्रियानंद- जे डोनाल्ड वॉल्टर्स

(क्रियानंद स्वामी जयंती विशेष.) वयाच्या २२व्या वर्षी वॉल्टर्स योगानंदांना भेटले, त्यांचे शिष्य बनले. नंतर १९५२मध्ये गुरू योगानंदाचे निधन झाल्यानंतर त्यांनी सेल्फ-रिलायझेशन फेलोशिप- एसआरएफ आश्रमात सेवा सुरू ठेवली. सन १९५५मध्ये वॉल्टर्स यांना संन्यासाची शपथ देण्यात आली आणि सरोलानंद, बिमलानंद आणि भक्तानंद यांच्यासह दया माता, तत्कालीन एसआरएफ अध्यक्षांनी एसआरएफ ऑर्डरचा भाऊ म्हणून नियुक्त केले आणि त्यांना क्रियानंद हे नाव देण्यात आले. सन १९६०मध्ये एम.डब्ल्यू.लुईसचे निधन झाल्यावर एसआरएफ संचालक मंडळाने क्रियानंद यांची संचालक मंडळावर आणि अखेरीस उपाध्यक्षपदी निवड केली. सन १९६२मध्ये संचालक मंडळाने त्यांना एसआरएफमधून काढून टाकण्यासाठी एकमताने मतदान केले आणि त्यांच्या राजीनाम्याची विनंती केली. क्रियानंद यांनी योगानंदांच्या जागतिक बंधुता वसाहतींच्या आदर्शावर आधारित आनंद या धार्मिक आणि सांप्रदायिक संघटनांची जागतिक चळवळ स्थापन केली.

क्रियानंद- जे डोनाल्ड वॉल्टर्स यांचा जन्म दि.१९ मे १९२६ रोजी टेलीजेन, रोमानिया येथे अमेरिकन पालक रे.पी. आणि गर्ट्रूड जी वॉल्टर्स यांच्या घरी झाला. त्यांचे वडील एस्सो कॉर्पोरेशनमध्ये तेल भूगर्भशास्त्रज्ञ होते, ज्यांना नंतर रोमानियन तेलक्षेत्रात नियुक्त केले गेले. रोमानिया, स्वित्झर्लंड, इंग्लंड आणि युनायटेड स्टेट्समध्ये त्यांनी आंतरराष्ट्रीय शिक्षण घेतले. त्याने हेव्हरफोर्ड कॉलेज आणि ब्राउन युनिव्हर्सिटीमध्ये शिक्षण घेतले, नंतर त्यांच्या वरिष्ठ वर्षात सोडले. त्यानंतर स्टेजक्राफ्टचा अभ्यास करण्यासाठी ते दक्षिण कॅरोलिनाला गेले. तेथे गेल्यानंतर वॉल्टर्सने भगवद्गीता वाचली आणि नंतर योगानंद यांचे योगींचे आत्मचरित्र वाचले. वॉल्टर्सच्या म्हणण्यानुसार त्यांना न्यूयॉर्क शहरातील पुस्तकांच्या दुकानात आत्मचरित्र सापडले आणि त्यामुळे त्यांचे जीवन बदलले. ते शाकाहारी बनले आणि सन १९४८मध्ये योगानंदांच्या शिष्यांपैकी एक बनण्यासाठी त्यांनी दक्षिण कॅलिफोर्नियाला बसने क्रॉस-कंट्री प्रवास केला. ते लॉस एंजेलिस, कॅलिफोर्निया येथे आल्यावर, वॉल्टर्स योगानंदांना भेटले आणि वॉल्टर्सच्या आत्मचरित्रानुसार शिष्यत्व आणि त्यागाची शपथ घेतली. वॉल्टर्सने लवकरच योगानंदांच्या सेल्फ-रिलायझेशन फेलोशिप संस्थेमध्ये नेतृत्वाचे स्थान प्राप्त केले आणि व्याख्याता म्हणून काम केले.

### घाटकोपरच्या दुर्घटनेतुन बीड नगरपालिका बोध घेणार का??

## न्यायालयाच्या आदेशाचा अवमान,शपथपत्राद्वारे दिशाभूल कि पुन्हा येरे माझ्या मागल्या :- डॉ.गणेश ढवळे

बीड:- मुंबईत घाटकोपर येथे अनाधिकृत होर्डिंग्ज कोसळुन १४ नागरीकांना जीव गमवावा लागला या दुर्घटनेनंतर बीड शहरातील अनाधिकृत होर्डींगचा मुद्दा चर्चेत आला असुन राज्याच्या नगरविकास विभागाने जिल्हाधिकारी व नगरपालिका मुख्याधिका-यांना तातडीने पत्र काढल्यानंतर निता अंधारे बीड नगरपालिकेच्या मुख्याधिकारी यांना जाग आली असुन शहरातील स्वच्छता निरीक्षकांची बैठक घेत शहरातील ६ होर्डिंग्ज चालकांना नोटीसा बजावण्याचे आदेश दिले असुन कारवाईसाठी ८ जणांची नियुक्ती केल्याचे समजते.बीड शहरातील अधिकृत होर्डिंग्जची संख्या ३८ असल्याचा नगरपालिका दावा करत असली तरी प्रत्यक्षात १०० पेक्षा जास्त अनाधिकृत होर्डिंग्ज दिसून येत आहेत.शहरातील ईमारतीवर नगरपालिकेची कोणतीही परवानगी न घेता आणि कुठलेही स्ट्रक्चरल आडीट न करताच धोकादायक होर्डिंग्ज लावण्यात आले आहेत.सामाजिक कार्यकर्ते यांनी वारंवार निवेदने तसेच आंदोलनानंतर सुद्धा केवळ २-४ होर्डिंग्ज काढुन कारवाई केल्याचे नाटक नगरपरिषद प्रशासन करत असल्याचे वारंवार सिद्ध झाले आहे त्यामुळे घाटकोपर येथील अनाधिकृत होर्डिंग्ज कोसळुन १४ जण मृत्युमुखी पडलेल्या दुर्घटनेनंतर तरी बीड नगरपरिषद प्रशासन बोध घेईल का?? कि नेहमी प्रमाणेच केवळ कारवाईचे नाटक करते हे पाहणं औत्सुक्याचे ठरेल तसेच या होर्डिंग्ज वरील जाहिरातीचा महसूल कोण गोळा करतं? या माध्यमातून शासनाचा महसूल बुडवुन कोणाची तिजोरी भरली जाते हा देखील संशोधनाचा विषय आहे असे मत सामाजिक कार्यकर्ते डॉ.गणेश ढवळे लिंबागणेशकर यांनी व्यक्त करत कायमस्वरूपी कठोर कारवाई करण्यात यावी अशी मागणी केली आहे.

बीड शहरातील अनधिकृत होर्डिंग्जची ठिकाणे

बीड शहरातील बंजारा हॉटेल, एसपी आफिस समोर,सारडा कपिटल कार्नर ,सेंन्ट अन्स स्कुलसमोर,शिवराज पान सेंटरच्या वर,केएसके कालेज समोर,नगरनाका महाराष्ट्र ग्रामीण बँकेसमोर,बंब सर्कल हिरालाल चौक, अक्षरधाम, बीड पंचायत समिती समोर,बालेपीर, बार्शी नाका चौक,जुने मारूती शोरूम,इंडीयन आईल पेट्रोल पंप



बार्शी रोड, मुक्ता लान्स अशा विविध ठिकाणी १०० पेक्षा जास्त ठिकाणी अनाधिकृत होर्डिंग्ज लावण्यात आलेली आहेत. तसेच बीड शहरातील महत्त्वाचे चौक, दुभाजक याठिकाणी लहानमोठे अनाधिकृत होर्डिंग्ज लावण्यात आलेले असुन ते अपघाताला निमंत्रण देत आहेत.

न्यायालयाच्या आदेशाचा आणि दाखल शपथपत्र यांचा नीता अंधारे मुख्याधिकारी नगरषरीषद यांच्या कडुन अवमान :- डॉ.गणेश ढवळे

बेकायदा होर्डिंग्ज,बनर, पोस्टर्स ,कमानी व जाहिराती हटवण्यासाठी काय पावले उचलण्यात आली याचा अहवाल सादर करण्याचे निर्देश मुंबई उच्च न्यायालयाने राज्य सरकारसह राज्यातील महापालिका आणि नगरषरीषदसह सर्वच नागरी संस्थांना दिलेले आहेत .सन २०१७ च्या निकालात मुंबई उच्च न्यायालयाने हे मान्य केले आहे की बेकायदेशीर होर्डिंग्ज वर कारवाई करणे तसेच गुन्हेगारांविरूद्ध गुन्हेगारी कायद्याची अंमलबजावणी करताना राजकीय वर्गाच्या सहभागामुळे महापालिका अधिकारी आणि पोलीस अधिकारी यांचे काम खुप कठीण होताना दिसत आहे.मात्र असे असताना बेकायदेशीर होर्डिंग्ज, बनर,कमानी व अशा प्रकारच्या आकाश चिन्हांच्या माध्यमातून शहराचे होणारे विद्रुपीकरण थांबवावे अशी उच्च न्यायालयाची इच्छा असल्याने सन २०२२ मध्ये मुंबई उच्च न्यायालयाने राज्य सरकार आणि राज्यातील सर्वच नागरी संस्थांना कारवाईचे निर्देश दिलेले आहेत.ज्यात महापालिका आणि नगरपरीषदांचा समावेश आहे.बेकायदेशीर होर्डिंग्ज,बनर , पोस्टर्स, कमानी काढुन टाकण्यासाठी केलेल्या उपाय योजनांचा अहवाल सादर करा तसेच बेकायदा होर्डिंग्जची यादी आणि कायदेशीर होर्डिंग्ज मधुन किती महसूल मिळतो याची माहिती असलेले प्रतिज्ञापत्र दाखल करा असे निर्देश उच्च न्यायालयाने दिले होते. न्यायालयाचे आदेश असतानाही संबंधित यंत्रणा अंमलबजावणी करत नसुन कर्तव्यात कसूर करत असल्याचे दिसून येते. बीड नगरपालिकेचे तत्कालीन मुख्याधिकारी उमेश ढाकणे यांनी जुन २०२२ मध्ये शपथपत्र दाखल केले होते.मात्र तरीही अद्याप अनाधिकृत होर्डिंग्ज प्रकरणात कारवाई झाल्याचे दिसून येत नाही.व्यावसायिक जाहिरात दारांनी शहराचे मोठ्या प्रमाणावर विद्रुपीकरण केले असून सामाजिक कार्यकर्ते यांच्या तक्रारीनंतर कारवाई तर सोडाच साधे होर्डिंग्ज हटवण्याची तसदी सुद्धा नगरपरिषद प्रशासन घेताना दिसत नाही.

चमकोगिरी करणाऱ्यांच्या वाढदिवसाच्या आणि शुभेच्छा होर्डिंग्ज मुळे वाहतुकीस अडथळा,अपघाताला निमंत्रण

बीड शहरात चमकोगिरी करणारांची मोठ्या प्रमाणावर खोगीरभरती असुन शहरातील मुख्य चौक मुख्य रस्त्यांवरही जयंती,उत्सव ,सण, आंदोलने, वाढदिवस आदी कार्यक्रमांचे सर्रास बनर लावले जातात. तसेच मुख्य रस्त्यांवरील दुभाजकांमध्येही बनर उभे केले जातात.अनेकदा हेच बनर हवेने खाली पडुन अपघात घडल्याच्या घटना घडलेल्या आहेत.याचा फटका सर्वसामान्यांना,वाहनधारकांना बसतो.त्यांना अनंत अडचणींचा सामना करावा लागतो. नगरपालिकेने विशेष मोहीम राबवुन अनाधिकृत बनर लागणार नाहीत याची काळजी घेणं आवश्यक आहे.मात्र नगर पालिका जाणिवपूर्वक दुर्लक्ष करत आहे.

# कौशल्य विकास उद्योजक्ता प्रशिक्षणासाठी अर्ज सादर करावेत

बीड, दि. 17 : साहित्यरत्न लोकशाहीर अण्णाभाऊ साठे विकास महामंडळ (मर्या.), जिल्हा कार्यालय बीड मार्फत मातंग समाज व तत्सम 12 पोटजातीतील कुंटुबाचे सामाजिक, आर्थिक व शैक्षणिक उन्नती व्हावी त्यांना रोजगार व स्वयं रोजगाराची साधने उपलब्ध व्हावी म्हणून समाजातील गरजूना आवश्यक त्या व्यवसायाचे प्रशिक्षण देवून त्यांना उपजिविकेचे साधन उपलब्ध होण्याकरिता प्रशिक्षण योजना राबविण्यात येत आहे. बीड जिल्हा कार्यालयास सन 2024-25 या आर्थिक वर्षांकरिता एकुण 500 प्रशिक्षणार्थींचे कौशल्य विकास उद्योजक्ता प्रशिक्षण कार्यक्रमाचे उद्दिष्ट मुख्यालयाकडून प्राप्त झालेले आहे. बीड जिल्हातील ज्या संस्थेने कौशल्य विकास व उद्योजकता प्रशिक्षण पोर्टल वरिल नोंदणी केलेली आहे. अशा प्रशिक्षण संस्थेने 31 मे 2024 पर्यत शासनाच्या नियमानूसार सर्व आवश्यक कागदपत्रासह दोन प्रतित प्रस्ताव व्यवस्थापकीय संचालक यांनी मान्यता दिलेली आहे. अटी, शर्ती / निकषा नुसार प्रस्ताव सादर करावेत. तसेच खालील अटी, शर्ती / निकष लागु राहतील.

प्रशिक्षणार्थीने निवडलेल्या प्रशिक्षणाची फी कौशल्य विकास व उद्योजकता विभागाने ठरवून दिलेल्या दराप्रमाणे करण्या दिनांक 20 ऑगस्ट 2019 मध्ये नमुद केलेल्या कोर्सेसची निवड प्रशिक्षणार्थीने करणे बंधनकारक राहिल. 2)प्रशिक्षण संस्थेने निकर्षांचे काटेकोरपणे पालन करणे आवश्यक आहे.प्रशिक्षणार्थींना प्रशिक्षण कालावधी पुर्ण केल्यानंतर शासनाच्या नियमानूसार आवश्यक त्या परिक्षेला बसविण्याची जबाबदारी संस्था चालकाची राहिल त्या शिवाय संस्थेची फी अदा केल्या जाणार नाही. प्रशिक्षण संस्थेला प्रशिक्षण कालावधी नुसार 20 % 30% 30% 20% च्या प्रमाणात प्रशिक्षण फी अदा करण्यात येईल. संस्थेने KVIC अंतर्गत प्रशिक्षण पुर्ण केलेल्या प्रशिक्षणार्थींनां PMEGP अंतर्गत निवडलेल्या व्यवसायाचा कर्जाचा अर्ज सादर करण्यासाठी सुचित करावे.जिल्हा स्तरावर एका कोर्सेसाठी प्रशिक्षण देण्यासाठी एकाच प्रशिक्षण संस्थेची निवड करण्यात येईल. प्रशिक्षणार्थींची बायोमॅट्रीक पध्दतीने व हजेरी पटावर स्वाक्षरीने हजेरी घेणे बंधनकारक राहिल. संस्थेने विद्यार्थी निहाय प्रमाणित केलेली हजेरी पाठविल्या शिवाय संबधीत प्रशिक्षण संस्थेची प्रशिक्षण फी अदा केली जाणार नाही. प्रशिक्षण घेण्याची ईच्छा असलेल्या अर्जदारासाठी अटी / निकष खालील प्रमाणे आहे.

अर्जदार मातंग समाज व तत्सम 12 पोटजातीतील असावा.अर्जदार महाराष्ट्रातील रहिवासी असावा. अर्जदाराचे वय 18 ते 50 वर्ष असावे.अर्जदाराने यापुर्वी शासनाच्या / महामंडळाच्या कोणत्याही प्रशिक्षण योजनेचा लाभ घेतलेला नसावा.अर्जदाराचे वार्षिक उत्पन्न 300000/- या पेक्षा जास्त नसावे. एका कुंटुबातील एकाच व्यक्तीस सदर योजनेचा लाभ घेता येईल. अर्जदाराने आधारकार्ड जोडलेल्या बँक खात्याच्या तपशिल सादर करावा. वरील अटी शर्ती नुसार संस्था चालकाने 31 मे 2024 पर्यंत प्रशिक्षण संस्थेने प्रस्ताव दोन प्रतीत साहित्यरत्न लोकशाहीर अण्णाभाऊ साठे विकास महामंडळ (मर्या ) डॉ. बाबासाहेब आंबेडकर सामाजिक न्याय भवन, शासकीय विश्रामगृहासमोर नगर रोड बीड जिल्हा कार्यालय येथे कार्यालयीन वेळेत सकाळी 09:45 ते संध्याकाळी 06:15 पर्यंत सादर करावेत. दि. 31 मे 2024 नंतर प्रस्ताव स्विकारले जाणार नाही यांची संबधितानी नोंद घ्यावी. असे आवाहन साहित्य रत्न अण्णाभाऊ साठे विकास महामंडळाचे जिल्हा व्यवस्थापक यांनी केले आहे.

# औषधी गुणधर्म असणारी करवंदे दुर्मिळ

डोंगराची काळी मैना म्हणून ओळखला जाणारी करवंद मानवी अतिक्रम व वृक्षतोड मुळे दुर्मिळ होत चाललेली आहे पूर्वी सहाजसहजी उपलब्ध होणारी डोंगराची काळी मैना आता मिळण्यासाठी मोठी कसरत करावी लागत आहे सोयगाव तालुक्यातील ग्रामीण भागातील शेतातील बांधावरील आणि डोंगरपट्ट्यात नैसर्गिकरीत्या बहरणारी काळी मैना म्हणजेच करवंदे कमी प्रमाणात उपलब्ध होत आहेत विविध कारणासाठी करवंदेच्या झुडपाची होणारी तोड व जंगलांना लागणारे वनवे यामुळे करवंदे नष्ट होत चाललेली आहेत उन्हाळ्यात कंरवदाची मोठी मागणी असते करवंदे चे झाड म्हणजेच करंजाच्या जाळी नैसर्गिकता डोंगरात आणि गायरान जमिनीत वाढतात कोणतीही कृत्रिम खत पाणी व संरक्षण विना वाढणारी करवंदे कच्ची असतात वनात पिकल्यानंतरही रुचकर लागतात शिवाय जसा सिरस बनवण्यासाठी करवंदे वापरली जातात आदिवासी बांधव उन्हाळ्यात कंरवदाचा व्यवसाय करून उदरनिर्वाह करतात परंतु गेल्या काही वर्षापासून नागरिकांसाठी जंगलावर होणारी अतिक्रम जंगलाला लागणारे व लावण्यात येणारे वने बदललेले हवामान यामुळे कंरवदे च्या नैसर्गिक उत्पादनात घट झालेली आहे यामुळे डोंगराची काळी मैना म्हणून ओळखली जाणारी करवंदे दिशेनाशी होण्याची



भीती व्यक्त केली जात आहे करवंदाचे औषधी गुणधर्म, रक्ताच्या कमतरतेमुळे अशक्तपणा असेल तर रोज मूठभर करवंदे खावीत यांना रक्ताची कमतरता नक्कीच भरून येईल तसेच शरीराची रोग प्रतिकारक शक्तीवाढविने क. जीवनसत्वे च्या भरपूर प्रमाणात असल्याने रोगप्रतिकारशक्तीवाढविने असे अनेक फायदे करवंदेचे सेवनामुळे होतात

## शेतक-यांनी 1 जून पूर्वी कापसाची लागवड करु नये

बीड, दि. 17 :सध्या अवकाळी पाऊस पडत असल्याने कापूस पिकावरील शेंदरी बोंडअळीच्या नियत्रंणासाठी कापसाची लागवड ही अशा अवकाळी पावसावर करणे योग्य होणार नाही. कापसाची लागवड ही कोणत्याही परिस्थितीत 1 जून पुर्वी करण्यात येऊ नये, असे आवाहन कृषी विभागाच्या वतीने करण्यात आले आहे.

1 जून पूर्वी लागवड केल्यास शेंदरी बोंडअळीचे जीवनचक्र खंडीत होत नाही व अळीचा प्रादुर्भाव अधिक वाढण्याची शक्यता असते. त्यामुळे येणारे उत्पादन गुणवत्तेत कमी पडते तसेच पिक उत्पादनाचा खर्च अधिक येतो. अशा मालाला दरही कमी मिळतो त्यामुळे पूर्व हंगामी लागवड किफायतशीर राहत नाही. शेतक-यांनी 1 जून पूर्वी कापसाची लागवड करु नये..

## राऊतमारे कुटुंबावर हल्ला करणाऱ्यांवर कारवाई करण्याची मागणी

### माजलगाव मधील सकल ब्राह्मण समाजाच्या वतीने प्रशासनास निवेदन.

बीड तालुक्यातील पिंपरगव्हाण येथील अशोक राऊतमारे या ब्राह्मण कुटुंबाच्या घरावर दगडफेक करण्यात आली तसेच आमच्या पक्षाला मतदान का केले नाही म्हणून राऊतमारे कुटुंबाचे विरोधात घोषणा देत घरासमोरील वाहनांची तोडफोड करीत कुटुंबातील सर्वांना मारहाण करण्यात आली यासाठी घटनेचा सकल ब्राह्मण समाजाच्या वतीने जाहीर निषेध व्यक्त करण्यात येत आहे तसेच या प्रकरणातील हल्लेखोर गावगुंडांना तात्काळ अटक करून कठोर कारवाई करण्यात यावी या संदर्भात जिल्हा प्रशासनाला निवेदन देण्यात आले. बीड येथील ब्राह्मण कुटुंब आपल्या मतदानाचा हक्क कुर्ला गावी बजावून आले त्यानंतर गावातील काही गुंड प्रवृत्तीच्या लोकांनी आमच्या पक्षाला मतदान का केले नाही म्हणून राऊतमारे यांच्या विरोधात घोषणाबाजी करीत घरावर तुफान दगडफेक केली तसेच घरातील सर्व व्यक्तींना मारहाण करण्यात आली एवढ्यावरच न थांबता घरासमोरील वाहनांची तोडफोड



करण्यात आली या घटनेचा माजलगाव ब्राह्मण समाजाच्या वतीने निषेध करण्यात आला तसेच सदरील गावगुंडांना अटक करण्यात यावी व योग्य ती कारवाई करण्यात यावी असे निवेदन माननीय तहसीलदार व उपजिल्हाधिकारी यांना देण्यात आले यांप्रसंगी ब्राह्मण समाजाचे चंद्रकांत देशमुख, वैभव जोशी, दत्ता महाजन, प्रशांत पाटील, राजेश देशमुख, किरण करंजकर, अनिकेत भिलेगावकर, गणेश कुलकर्णी, पराग खोडसकर, स्वानंद नाईक, भालचंद्र पाठक अमोल जोशी व इतर समाज बांधव उपस्थित होते.

## कोविड वारिअर रेणुका फाउंडेशनच्या वतीने अनाथालयात साहित्याचे वाटप

**माजलगाव,** दि. 16 प्रतिनिधी: येथील कोविड वारिअर रेणुका वाघमारे यांच्या तिस-या पुण्यस्मरण दिनानिमीत्त वडवणी तालुक्यातील ढेकणमोहा येथील पसायदान अनाथालयातील मुलांना खाउ, शालेय साहित्य तसेच एक क्विंटल ज्वारीचे वाटप आज दि. 16 मे 2024 रोजी करण्यात आले. येथील रेणुका अभिमन्यु वाघमारे या शासकीय रूग्णालयात नर्स म्हणुन कार्यरत होत्या तर कोरोना काळातही त्यांनी उल्लेखनिय कार्य केलेले आहे. याकाळातच त्यांना देखिल कोरोनाची लागण झाली आणि यातच त्यांचा मृत्यु झाल्याची दुःखद घटना 2021 मध्ये घडली. तेंव्हापासुन वाघमारे कुटूंबीयांनी कोविड




वारिअर रेणुका फाउंडेशनची स्थापना केलेली असुन त्या फाउंडेशनच्या अंतर्गत विवीध समाजोपयोगी उपक्रम राबविलेले आहेत. यामध्ये संविधान दिनानिमीत्त सर्व शासकीय कार्यालयात संविधानाची प्रत वाटप, रक्तदान शिबीर, शासकीय रूग्णालयात फळ वाटप, शासकीय रूग्णांलयातील गोर, गरिब, गरजुवंत रूग्णांना आर्थिक मदत असे विवीध सामाजिक उपक्रम राबवित त्यांच्या स्मृती जपण्याचे काम केले आहे. यावर्षी देखिल स्व. रेणुका वाघमारे यांच्या तृतीय पुण्यस्मरण दिनानिमीत्त वडवणी तालुक्यातील ढेकणमोहा येथील पसायदान अनाथालयातील मुलांना खाउ, शालेय साहित्य तसेच एक क्विंटल ज्वारीचे वाटप करण्यात आले. यावेळी फाउंडेशनचे अध्यक्ष अनिकेत वाघमारे, पसायदानचे अनाथालयाचे श्री. दराडे, श्रीमती दराडे व अनाथालयातील चिमुकले व वाघमारे कुटूंबीय उपस्थित होते. दरम्यान मिळालेल्या खाउने चिमुकल्या अनाथ विद्यार्थ्यांच्या चेह-यावर हास्य उमलले होते.

## कीड रोग व्यवस्थापन पुस्तकेत सुधारणा कळविण्याचे आवाहन

बीड, दि. 17 : कृषी विभाग, महाराष्ट्र शासनामार्फत "भरडधान्य, पौष्टिक तृणधान्य, कडधान्य, गळीतधान्य पिकांचे क्षेत्र, उत्पादन व उत्पादकता वाढविण्यास शिफारशी" ही पुस्तिका तयार करण्याचे काम सुरू आहे. सदर पुस्तिकेमध्ये भरडधान्य, पौष्टिक तृणधान्य, कडधान्य, गळीतधान्य पिकांचे पेरणीपासून काढणी पर्यंतचे लागवड तंत्रज्ञान, कीड रोग व्यवस्थापन या विषयी माहिती देण्यात आली आहे. सदर पुस्तिकेच्या Draft चा क्यु आर कोड सोबत देण्यात येत आहे. या पुस्तिकेमध्ये काही सुधारणा तसेच अतिरिक्त माहिती द्यावयाची असल्यास कृषी आयुक्तालयाच्या ddinfor@gmail.com या मेलवर कळविण्यात यावे .असे कृषी आयुक्तालय, महाराष्ट्र राज्य पुण्याचे, कृषी संचालक (विस्तार व प्रशिक्षण) यांनी प्रसिध्दी पत्रकाव्दारे कळविले आहे.



## तलाठी भवन जवळील वाकलेला खांब चार दिवस नंतर देखील जैसे थे....

**तळोदा/उल्हास मगरे**

- तळोदा तालुक्यात बुधवार रोजी संध्याकाळी सहाच्या सुमारास अर्धा तास आलेल्या अवकाळी पाऊस व वादळ, वाऱ्यामुळे तळोदा शहर परिसरातील महावितरण विभागाचे दोन लोखंडी पोल जोरदार हवेमुळे वाकले होते. दरम्यान त्यातील एक लोखंडी पोल बदलला असून, त्यापैकी दुसरा जैसे थे असल्याने वाहतुकीला अडथळा निर्माण होतो आहे.

अवकाळी वादळ वाऱ्याचा जोर इतका प्रचंड होता की, लोखंडी पोल देखील वाकवले आहेत. त्यामुळे महावितरण कंपनीला लाखोंचा फटका बसलेला दिसुन येत आहे. बुधवार रोजी वादळी वाऱ्यामुळे तलाठी भवन जवळील लोखंडी पोल रहदारीच्या मेन रस्त्यावरच वाकला आहे. सदरील पोल तळोदा शहरातील तहसील कार्यालय, पंचायत समिती, पोलीस स्टेशन कडे जाणाऱ्या रस्त्यावर असल्याने त्याला लवकरात लवकर काढण्याची मागणी जोर धरू लागली आहे. महत्वाचे म्हणजे ह्या रस्त्यावर तालुक्यातील गोर गरीबांना पुरविण्यात येणारे स्वस्त धान्य पुरवठा करणारे गोदाम असल्याने धान्य भरलेले ट्रक किंवा कंटेनर जाऊ शकत नसल्याने गोर गरीब जनतेला धान्य मिळणे अवघड होणार असल्याचे बोलले जात आहे. त्यामुळे सदरील लोखंडी पोल अडथळा निर्माण करीत असल्याने लवकरात लवकर काढण्याची मागणी जोर धरू लागली आहे. सदरील रस्त्यावरून दररोज शासकीय अधिकारी व कर्मचारी दररोज प्रवास करीत असतात परंतु त्यांनी देखील बघ्याची भुमिका घेतली असल्याने कुणीही बोलायला तयार नसल्याचे बोलले जात आहे.

## 'शरद पवार यांना एकच आव्हान, तुम्ही राहुल गांधींना....', नरेंद्र मोदींचं चॅलेंज

पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी राष्ट्रवादी काँग्रेस शरदचंद्र पवार पक्षाचे प्रमुख शरद पवार यांना उघडपणे चॅलेंज दिलं. महायुतीची आज मुंबईत जाहीर सभा पार पडली. या सभेला पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी उपस्थिती लावली. या सभेत भाषण करताना नरेंद्र मोदी यांनी शरद पवार, काँग्रेस नेते राहुल गांधी, ठाकरे गटाचे प्रमुख उद्धव ठाकरे आणि इंडिया आघाडीवर निशाणा साधला. यावेळी नरेंद्र मोदी यांनी शरद पवारांना तुम्ही राहुल गांधींना सांगा जीवनभर वीर सावरकरांच्या विरोधात एक शब्द बोलणार नाही हे उदवून घ्या, असं चॅलेंज दिलं. यावेळी नरेंद्र मोदी यांनी राहुल गांधी यांच्यावरही सडकून टीका केली. नकली शिवसैनिकांनी बाळासाहेबांना धोका दिला. शिवसैनिकांचं बलिदान वाया घालवलं. सत्तेसाठी ते राम मंदिराला शिव्या घालणाऱ्या सोबत गेले, सावरकरांना शिव्या घालणाऱ्या काँग्रेसच्या मांडीवर जाऊन बसले. मी शरद पवार यांना आव्हान देतो. तुम्ही राहुल गांधींना सांगा जीवनभर वीर सावरकरांच्या विरोधात एक शब्द बोलणार नाही हे राहुल गांधींकडून उदवून घ्या. कारण ते करणार नाही. निवडणुका झाल्यावर ते पुन्हा सावरकरांना शिव्या घालायला सुरुवात करतील. आता निवडणुका आहेत म्हणून त्यांच्या तोंडाला टाळं लागलं आहे", असा दावा राहुल गांधी यांनी केला.

## आर्वी येथे मंगळवारपासूनवार्षिक हरिनाम सप्ताह

### यंदा दुसरे वर्ष, महंत जनार्दन महाराज यांच्या नेतृत्वात आयोजन

**प्रतिनिधी| बीड**

शिरुर तालुक्यातील आर्वी येथे मंगळवार २१ मे पासून वार्षिक अखंड हरिनाम सप्ताहाला सुरुवात होणार आहे. यंदा सप्ताहाचे दुसरे वर्ष आहे. मत्स्येंद्रनाथ संस्थानचे महंत स्वामी जनार्दन महाराज यांच्या नेतृत्वात सप्ताहाचे आयोजन करण्यात आले आहे. सप्ताहात ब्रह्मनाथ संस्थानचे महंत रामेश्वर शास्त्री यांची भागवत कथा होणार आहे.

शिरुर तालुक्यातील आर्वी येथे गतवर्षीपासून वार्षिक अखंड हरिनाम सप्ताह प्रथेला सुरुवात झाली आहे. मत्स्येंद्रनाथ संस्थानचे महंत स्वामी जनार्दन महाराज यांच्या पुढकारातून या सप्ताह परंपरेला सुरुवात झाली आहे. यंदा २१ मे ते २७ मे या काळात सप्ताह होणार आहे. २१ मे रोजी गावातून शोभायात्रा काढून संत, महंताच्या उपस्थितीत पुष्पवृष्टी करुन सप्ताहाला सुरुवात होणार आहे. सप्ताहात उद्धव महाराज शास्त्री, योगीराज महाराज, हनुमान महाराज शास्त्री, शितलताई साबळे, सतीश महाराज, शिवाजी महाराज देशमुख, रोहिणीताई महाराज परांजपे यांची किर्तने होणार आहेत. २७ मे रोजी दुपारी ११ ते १ या वेळेत महंत स्वामी जनार्दन महाराज मत्स्येंद्रगडकर यांचे काल्याचे किर्तन होणार आहे. उपस्थित राहण्याचे आवाहन गावकऱ्यांच्या वतीने करण्यात आली आहे.



दैनिक लोकक्रांतीचा आरंभ

# लोकआरंभ

शनिवार १८ मे २०२४






# यूट्यूबवर व्हिडिओ पाहून नववी पास तरुणाने टाकला बनावट नोटांचा छापखाना, लाखो रुपयांच्या नोटा आणल्या चलनात





मोबाईल सर्वांच्या हातात आल्यानंतर कोणत्याही विषयावर माहिती मिळवणे सोपे झाले आहे. यूट्यब आणि गुगलवर माहितीची खजीना मिळतो. एका नवीन पास असलेल्या २६ वर्षीय तरुणाने गजबचे काम केले. त्या तरुणाने यूट्यूबवर नोटा छापण्यासंदर्भातील व्हिडिओ पाहिले. त्यानंतर स्वत:च बनावट नोटा टाकण्याच्या कारखाना टाकला. लाखो रुपयांच्या नोटा त्या तरुणाने चलनात आणल्या आहे. प्रफुल्ल पाटील असे त्या तरुणाचे नाव असून नवी मुंबई पोलिसांनी त्याला तळोजा परिसरातून अटक केली आहे. सापळा रचत अटक नवी मुंबईतील तळोजा परिसरात प्रफुल्ल पाटील (२६) हा तरुण राहतो. त्याचे शिक्षण केवळ नववीपर्यंत झाले आहे. तो बनावट नोटा छापत असल्याची माहिती पोलिसांना मिळाली. त्यानंतर गुन्हे शाखेच्या पथकाने सापळा रचत त्याला अटक केली. पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार प्रफुल्ल पाटील याने यूट्यूबवर व्हिडिओ बघून आणि माहिती घेत या नोटांची छपाई केली. संगणक व प्रिंटरचा वापर करत त्याने या नोटा छापल्या. पोलिसांना मिळाल्या बनावट नोटा नववीपर्यंत शिक्षण झालेल्या तरुणाने बनावट नोटांचा छापखाना टाकल्याची धक्कादायक घटना उघड झाल्यानंतर पोलीस हादरले. पोलिसांना माहिती मिळाल्यावर मध्यरात्री धाड टाकली. त्याला ताब्यात घेऊन झाडाझडती घेतली. त्याच्या जवळ आणि घरात एकूण 2 लाखांच्या बनावट नोटा हस्तगत केल्या.

### 10,20,50,100 आणि 200 रुपयांचा नोटा

प्रफुल्ल पाटील याच्याकडून आतापर्यंत 10,20,50,100 आणि 200 रुपयांचा एकूण 1443 बनावट नोटा हस्तगत केल्या. गेल्या चार महिन्यांपासून तो नोटा छापून चलनात आणत होतो. परंतु त्याची माहिती पोलीस यंत्रणेस मिळाली नाही. आतापर्यंत लाखो रुपयांच्या नोटा त्याने चलनात आणल्या आहे. एकूण किती नोटा चलनात आल्या आहेत, याचा तपास सुरू आहे.

## सायकल चालवा,हृदयरोग टाळा,पायी चाला हृदय सांभाळामेडिकेयरच्या रॅलीने दणाणले बीड;जागतिक उच्च रक्तदाबनिमित्त राबविला उपक्रम



बीड दि.१७ (प्रतिनिधी)- हृदयरोगासाठी सुप्रसिद्ध असलेल्या चंपावती मेडिकेयर हार्ट रुग्णालयाच्या वतीने शुक्रवारी (दि.१७) जागतिक उच्च रक्तदाब दिनानिमित्त भव्य रॅली काढण्यात आली होती.या रॅलीतील 'सायकल चालवा,हृदयरोग टाळा,पायी चाला हृदय सांभाळा'घोषणांनी बीड शहर दणाणून गेले होते. या रॅलीत डॉ.सुनील बोबडे,डॉ. राधाकिसन डाके,सुरेश पिंपळे यांच्यासह अधिपरिचारिक विद्यार्थ्यांची मोठ्या संख्येने उपस्थिती होती.

बीडमध्ये खाजगी हॉस्पिटलच्या वतीने जागतिक उच्च रक्तदाबनिमित्त पहिल्यांदाच असा अभिनव उपक्रम राबविण्यात आला. आजच्या धावपळीच्या जीवनात प्रत्येकाचे जीवनमान बदलले आहे.धकाधकीच्या जीवनात शरीराकडे लक्ष देण्यासाठी ही वेळ मिळत नसल्याने अनेकांना विविध आजारांनी ग्रासलेले आहे. त्यामुळे निरोगी जीवनमानासाठी १ तास शरीराला देण्याचा मूलमंत्र यावेळी डॉ.सुनील बोबडे व राधाकिसन डाके यांनी दिला. सकाळी ९ वाजता मेडिकेयर हॉस्पिटलपासून निघालेली रॅली छत्रपती शिवाजी महाराज यांच्या पुतळ्याला प्रदक्षिणा घालून बार्शी रोडने परत आली.यावेळी रॅलीत तंदरुस्त शरीरासाठी आणि आरोग्याच्या दृष्टीने विविध फलक हातात घेऊन डॉक्टर आणि अधिपरिचारिक सहभागी झाल्याचे आढळून आले.या रॅलीने बीडवासियांचे लक्ष वेधले होते.

## वरंध घाट पुन्हा बंद, कोकणात जाण्यासाठी हा असणार पर्यायी मार्ग



पुणे शहरातून कोकणात जाणाऱ्या लोकांसाठी महत्वाची बातमी आहे. आता त्यांच्यासाठी वरंध घाट बंद करण्यात आला आहे. भोरमार्गे महाडला जाणाऱ्या वरंध घाट मार्गावरची सर्व प्रकारची वाहतूक पुन्हा बंद करण्यात आली आहे. वरंध घाटातील रायगड जिल्ह्याच्या हद्दीत 21 किलोमीटर लांबीच्या रस्त्याची कामे पुन्हा सुरु करण्यात येत आहेत. त्यामुळे वाहतूक बंद करण्यात आली.कोणती कामे होणार सुरुवरंध घाटात रस्त्याचे दुपदरीकरणं, संरक्षक भिंत बांधणे तसेच आवश्यक सुरक्षा उपाययोजना करण्याची कामे सुरू आहेत. ही कामे सुरू असताना अपघात होण्याची शक्यता असल्यामुळे सुरक्षिततेच्या कारणास्तव 1 एप्रिल पासून 30 मे पर्यंत वाहतूक बंद ठेवण्याचा निर्णय घेण्यात आला होता.

# आझाद नगरचा अर्धवट सोडलेला बायपास सिमेंटरस्ता तात्काळ सुरु करा

## सय्यद सलीमबापुंच्या नेतृत्वाखालीआझादनगर संघर्ष समितीचे नपला निवेदन

माजलगाव शहरातील आझाद नगर येथे होत असलेल्या सिमेंटरस्त्याला नपचे इंजिनीयर व माजी नगरसेवक आळा घालत आहेत. राजकीय सूड भावनेने हा प्रकार केल्या जात आहे.त्यामुळे येथील स्थानिक नागरिकांचे अर्धवट झालेल्या रस्त्यामुळे हाल होत आहेत.त्यामुळे हा रस्ता तात्काळ सुरू करण्यात यावा,नसता, आझाद नगरजवळ राष्ट्रीय महामार्गावर दि.२० रोजी रास्ता रोको करन्यात येईल असा इशारा निवेदनाद्वारे आझाद नगर संघर्ष समितीच्या वतीने देण्यात आला. माजलगाव नगर परिषदेत भ्रष्ट कारभाराने उच्चांक गाठला आहे. आझाद नगर येथे होत असलेला धारूररोड ते बायपास सिमेंट रस्त्याला नप मुख्याधिकारी, इंजिनियर व येथील एक माजी नगरसेवक राजकीय सुडभावनेने अडथळे आणत आहेत. जाणून बुजून हा रस्ता अर्धवट काम करून सोडला आहे.त्यामुळे रस्त्याविना येथील नागरिकांचे हाल होत आहेत.सर्वत्र घाणीचे साम्राज्य आहे.त्याचप्रमाणे शहरात झालेले नाली बांधकाम सिमेंट रस्ते पाईपलाईन निकृष्ट,बोगस दर्जाची झाली आहेत. या सर्व कामाची कॉलिटी कंट्रोलद्वारे तपासणी करन्यात यावी,त्याचप्रमाणे ओपन स्पेसवरील सर्व अतिक्रमणे काढून शहरातील सर्व डीपी रोड चालू करण्यात यावेत यावेत.तसेच नप मध्ये आलेल्या शासकीय फंडात मोठा भ्रष्टाचार झाला आहे याचीही चौकशी करण्यात यावी. नसता २० मे रोजी आझाद नगरच्या पुलाजवळ राष्ट्रीय महामार्गावर माजी नगरसेवक स.सलीमबापू यांच्या नेतृत्वाखाली रास्ता रोको आंदोलन करण्यात येईल. व पुढील आंदोलन विभागीय कार्यालयावर करण्यात येईल असा इशारा निवेदनाद्वारे आझाद नगर संघर्ष समितीच्या वतीने नगरपरिषदेला देण्यात आला आहे. या निवेदनावर स.फारुखअण्णा,मेहबूब चुन्नू, रईसकादरी,शेख सादेक इब्राहिम, समशेरखान साहेबखान पठाण, सत्तारभाई टेलर,सय्यद रहीम फिटर,बाबासाहेब साळवे,सोनबा धिरे,शेख जमील,अतिक अन्सर खान,महेमुब मिरझा बेग,शेख इलियास मासुम,इत्यादीच्या स्वाक्षऱ्या आहेत.



### आ.प्रकाश सोळंके यांनी राजकीय सूड भावनेने रस्ता अडवला. सय्यद सलीमबापु.

शहरातील आजाद नगर ही हातावर पोट भरणाऱ्या गोरगरिबांची मोठी वस्ती आहे. ठिकाणी दलित,मुस्लिम मराठा,बहुजन अठरापगड जातीचे लोक राहतात.आ.प्रकाश सोळंके यांना या प्रभागातून मोठा राजकीय विरोध होतो.आशी आकस भावना मनात बाळगून आ.प्रकाश सोळंके या वस्तीकडे पाहत आले आहेत. हा होत असलेला सिमेंट रस्ताही त्यांनी मुख्याधिकारी,इंजिनियर व येथील एका माजी नगरसेवकाला हाताशी धरून राजकीय सूड भावनेने अडवल्याचा आरोप माजी नगरसेवक सय्यद सलीमबापू यांनी आ.सोळंके यांच्यावर केला आहे.

हे पत्रक मालक, मुद्रक, प्रकाशक, संपादक राहुल मारुतीराव वाईकर यांनी राजवीर प्रिंटर्स, राजमाता जिजाऊ कॉलनी, नवगण कॉलेज रोड, बीड जि.बीड-४३११२२ (महाराष्ट्र) येथे छापून दैनिक लोक आरंभ कार्यालय, हाऊस नं.०१/०३/८६२० राजमाता जिजाऊ कॉलनी, नवगण कॉलेज रोड, बीड जि. बीड- ४३११२२ (महाराष्ट्र) येथे प्रसिद्ध केले. मो. ९२७२१३२४५०, संपादक: राहुल मारोतीराव वाईकर Email : dainiklokaarambh@gmail.com